॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

अहिल्यानगर | बुधवार, दि. २० मे २०२६ | वर्ष ६ वे | अंक ३६० वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

*** सुविचार ***

दुसऱ्याच्या आनंदाच आनंद
मानणारा खरा आनंदी असतो

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### काटकसर

अधूनमधून असेच
विरोधकांवर घसरायचे
काटकसरीच्या नावाने
पुढे हात पसरायचे
बिघडली अर्थव्यवस्था
तर त्याला हजार कारणे
निर्बंधात गुदमरले पण
अजून फिटेना पारणे

## SPOT NEWS

### राज्यभरात इंधन टंचाई!

● **मुंबई** – तांत्रिक कारणांमुळे ग्रामीण भागातील पंपांना डिझेलचा पुरवठा कमी केला जात असल्याने ट्रॅक्टर मालकांना पुरेसे डिझेल मिळेनासे झाले आहे. सध्या पेट्रोल पंपांवर मिळणाऱ्या डिझेलमध्ये तीन ते चार तास मशागतीची काम करणे शक्य असल्याचे ट्रॅक्टर मालकांनी सांगितले. परिणामी, पावसाळा तोंडावर असताना डिझेलअभावी शेतातील खरीप हंगामपूर्व मशागतीची कामे ठप्प झाल्याने शेतकऱ्यांवरील संकट गडद होत चालल्याचे चित्र आहे. आज घडीला बहुतांश शेतकरी ट्रॅक्टर व पॉवर टिलरच्या मदतीने शेतीची कामे करवून घेतात. ग्रामीण भागातील पेट्रोल पंपमालकांनी ट्रॅक्टर मालकांना ११ मेपासून रोज १० ते १५ लिटरपेक्षा अधिक डिझेल देणे बंद केले आहे. त्यामुळे मिळणाऱ्या या डिझेलमध्ये तीन ते चार तास नांगरटी किंवा वखरणी करणे शक्य होत नसून, उर्वरित २० ते २१ तास ट्रॅक्टर काम बंद करून केवळ उभा करून ठेवावा लागत आहे.

### पेट्रोल-डिझेलच्या दरात पुन्हा वाढ

● **नवी दिल्ली** – पेट्रोल-डिझेलच्या दरात मंगळवार दि. १९ मे रोजी पुन्हा वाढ झाली. चार दिवसांमध्ये कंपन्यांनी दुसऱ्यांदा तेल वाढ केली. त्यामुळे दर चार रुपयांनी वाढले आहेत. याचा थेट फटका सामान्यांच्या बजेटला बसला आहे. कच्चा तेलाचे दर वाढत असून त्याचा थेट भार तेल कंपन्यांना उचलावा लागू नये म्हणून आणखी इंधन दरवाढ होण्याची शक्यता आहे, ही दरवाढ ९० पैसे फॉर्म्युल्याने केली जाईल का, अशी चर्चा सुरू झाली आहे.

# क्रिमीलेअर मर्यादा ८ लाखांवरून १५ लाख करण्याची शिफारस

## ओबीसी समाजासाठी मोठा निर्णय शक्य । ४३ नव्या जातींच्या समावेशाचा प्रस्ताव

● **मुंबई । वीरभूमी** – राज्यातील ओबीसी समाजासाठी अत्यंत महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. महाराष्ट्र सरकारच्या ओबीसी कल्याणविषयक मंत्रिमंडळ उपसमितीने ओबीसी नॉन-क्रिमीलेअरची वार्षिक उत्पन्न मर्यादा सध्याच्या ८ लाख रुपयांवरून थेट १५ लाख रुपये करण्याची शिफारस केली आहे. याचबरोबर ओबीसी प्रवर्गात ४३ नव्या जातींचा समावेश करण्याचाही प्रस्ताव पुढे आला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. या शिफारशीवर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत लवकरच अंतिम चर्चा होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

ओबीसी आरक्षणातील आर्थिकदृष्ट्या सक्षम घटकांना आरक्षणाचा लाभ मिळू नये म्हणून 'क्रिमीलेअर'ची संकल्पना लागू करण्यात आली होती. सध्या ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांना ओबीसी आरक्षणातील लाभ मिळत नाहीत. मात्र वाढती महागाई, सातव्या वेतन आयोगानंतर वाढलेले पगार, शिक्षण आणि आरोग्याचा वाढता खर्च यामुळे मध्यमवर्गीय ओबीसी कुटुंबेही आर्थिक अडचणीत असल्याचा मुद्दा गेल्या काही वर्षांपासून सातत्याने उपस्थित केला जात होता. त्यामुळे ही मर्यादा वाढवण्याची मागणी जोर धरत होती.



उपसमितीच्या बैठकीत ओबीसी प्रवर्गात ४३ नव्या जातींचा समावेश करण्याबाबतही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. हा प्रस्ताव केंद्र सरकार आणि राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाकडे पाठवण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. सरकारच्या माहितीनुसार, काही समाजघटकांना तांत्रिक अडचणी, स्पेलिंगमधील चुका किंवा प्रशासकीय कारणांमुळे ओबीसी लाभांपासून वंचित राहावे लागत होते. अशा प्रकरणांवरही तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.

बैठकीत ओबीसी जात पडताळणीच्या प्रलंबित प्रकरणांवर नाराजी व्यक्त करण्यात आली. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी पडताळणी प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच चुकीच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे मिळू नयेत, यासाठीही अधिक काटेकोर यंत्रणा उभारण्यावर भर देण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसी समाजाच्या सक्षमीकरणासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याचे पुन्हा स्पष्ट केले आहे. ओबीसी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, परदेशी शिक्षणासाठी आर्थिक मदत, मुलींसाठी १०० टक्के फी सवलत, तसेच स्पर्धा परीक्षांसाठी प्रशिक्षण अशा विविध योजना राबवल्या जात असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये मुला-मुलींसाठी वसतिगृहे सुरू करण्यात आली असून 'स्वयंम' योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना ६० हजार रुपयांपर्यंत आर्थिक मदत दिली जात असल्याची माहितीही सरकारने दिली आहे.

दरम्यान, नुकत्याच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या एका महत्त्वपूर्ण निर्णयात 'क्रिमीलेअर' ठरवताना केवळ उत्पन्नच नव्हे, तर पालकांची नोकरीची श्रेणी आणि सामाजिक स्थिती यांचाही विचार करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले होते. यामुळे आगामी काळात ओबीसी आरक्षण धोरणात आणखी व्यापक बदल होण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.

### उत्पन्न मर्यादा वाढल्यास हे होणार बदल

■ जर राज्य सरकार आणि केंद्र सरकारने ही शिफारस मंजूर केली, तर वार्षिक १५ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्या ओबीसी कुटुंबांतील विद्यार्थ्यांना आणि उमेदवारांना शैक्षणिक प्रवेश, शिष्यवृत्ती आणि सरकारी नोकरीतील आरक्षणाचा लाभ घेता येणार आहे. यामुळे लाखो मध्यमवर्गीय ओबीसी कुटुंबांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः स्पर्धा परीक्षा, व्यावसायिक शिक्षण आणि सरकारी भरती प्रक्रियेत याचा मोठा परिणाम होऊ शकतो.

## आचारसंहितेमुळे कर्जमाफी लांबणीवर?

● **मुंबई । वीरभूमी** – महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीवेळी सत्तेत येण्यासाठी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. कर्जमाफीचा निर्णय आता आणखी काही दिवस लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जून महिन्यापर्यंत कर्जमाफी होईल, असे आश्वासन दिले होते. मात्र, कर्जमाफीच्या या निर्णयाला विधानपरिषद निवडणुकीच्या आचारसंहितेचा ब्रेक लागला आहे. विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता सोमवारपासून लागू होणार आहे.

ही निवडणूक बिनविरोध न झाल्यास २५ जूनपर्यंत आचारसंहिता राहणार आहे. ३० जूनपूर्वी शेतकरी कर्जमाफी करण्याचे सरकारचे आश्वासन होते. सहकार मंत्रालयाने तसा प्रस्तावही तयार केला होता. मात्र, आता विधानपरिषद निवडणुकीमुळे हा निर्णय लांबवणीवर पडणार, असे दिसत आहे. यामुळे बळीराजाला कर्जमाफीसाठी आणखी काही दिवस वाट पाहावी लागणार आहे.

विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यास शेतकरी कर्जमाफीच्या अंमलबजावणीत अडचणीची शक्यता वर्तविली जात आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीत महापालिकांचे सर्व नगरसेवक, नगरपालिका, नगरपंचायतींचे अध्यक्ष आणि नगरसेवक, जिल्हा परिषदेचे सदस्य, सर्व स्विकृत सदस्य आणि कॅन्टोन्मेंट बोर्डाचे सदस्य असतात. सर्वसामान्य मतदार नसल्याने सरकारकडून कर्जमाफीचा निर्णय घेतला जाऊ शकतो, अशी सूत्रांची माहिती आहे.


## पारनेर तालुक्यात पाण्यात बुडून दोघांचा दुर्दैवी मृत्यू

### बहिरोबावाडी व नांदूर पठार येथील घटना । उन्हाळ्यातील पोहण्याचे धोके पुन्हा वाढले

● **पारनेर । वीरभूमी** – पारनेर तालुक्यात सोमवार, दि. १८ मे रोजी दोन वेगवेगळ्या ठिकाणी घडलेल्या दुर्दैवी घटनांमध्ये पाण्यात बुडून दोघांचा मृत्यू झाला. या घटनांमुळे तालुक्यात हळहळ व्यक्त होत असून, उन्हाळ्यात पोहण्यासाठी जाणाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

पहिली घटना तालुक्यातील पठार भागातील बहिरोबावाडी येथे घडली. सोमवार दुपारी बारा वाजेच्या सुमारास तिखोल रस्त्यालगत असलेल्या एका शेततळ्यात परिसरातील १० ते १२ लहान मुले आणि काही युवक पोहण्यासाठी गेले होते. यामध्ये साई सिताराम देठे (वय ११) हा मुलगा पाठीला प्लास्टिकचा ड्रम बांधून पोहणे शिकत होता.

मात्र, पोहत असताना अचानक त्याच्या पाठीला बांधलेला ड्रम निसटला. त्यामुळे साईचा पाण्याचा अंदाज चुकला आणि तो





शेततळ्याच्या खोल पाण्यात बुडू लागला. ही बाब इतर मुलांच्या लक्षात येताच त्यांनी आरडाओरडा करत मदतीसाठी धावपळ केली. रस्त्याने जाणाऱ्या एका जागरूक नागरिकाने तातडीने शेततळ्यात उडी घेत साईला बाहेर काढले. त्याला त्वरित जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले. या घटनेमुळे देठे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

दुसरी घटना त्याच दिवशी दुपारी दोन वाजेच्या सुमारास नांदूर पठार येथे घडली. येथील मोरदरा पाझर तलाव परिसरातील एका विहिरीमध्ये बाळकृष्ण अनंत कुलकर्णी ऊर्फ बंटीकाका (वय ३४) हे पोहण्यासाठी गेले होते. त्यांनी विहिरीत उडी मारल्यानंतर अचानक त्यांना चक्कर आल्यासारखे झाले. शारीरिक अस्वस्थता निर्माण झाल्याने त्यांना नीट पोहता आले नाही आणि ते खोल पाण्यात बुडाले.

विहीर खोल असल्याने त्यांना वेळेत बाहेर काढणे शक्य झाले नाही. त्यांना तत्काळ टाकळी ढोकेश्वर येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, तेथील डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

बहिरोबावाडी आणि नांदूर पठार येथे अवघ्या काही तासांच्या अंतराने घडलेल्या या दोन घटनांमुळे संपूर्ण पारनेर तालुक्यात शोककळा पसरली आहे. उन्हाळ्यात शेततळे, विहिरी किंवा पाणवठ्यांमध्ये पोहण्यासाठी जाताना नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याची गरज असल्याचे या घटनांवरून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

# महावितरणचा मोठा निर्णय! आता पात्र ग्राहकांचे वीजबिल होणार शून्य

## 'स्मार्ट' योजनेतून १ किलोवॅट सौर प्रकल्प अल्प खर्चात । २५ वर्षे मोफत विजेचा दावा

● **पुणे । वीरभूमी** – पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजनेला गती देण्यासाठी महावितरणकडून विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप (स्मार्ट) योजनेअंतर्गत पात्र वीज ग्राहकांचे वीजबिल शून्य करण्याचा प्रयत्न असून, घराच्या छतावर १ किलोवॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प अत्यल्प खर्चात बसविण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे, अशी माहिती महावितरणने दिली.

देशभरात मे महिना 'सोलार महिना' म्हणून साजरा केला जात असून, 'पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजना' अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी विविध जनजागृती उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. यामध्ये विविध स्पर्धांचाही समावेश आहे. या पार्श्वभूमीवर 'स्मार्ट' योजनेअंतर्गत घरगुती वीज ग्राहकांना आपल्या घराच्या छतावर १ किलोवॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

'स्मार्ट' योजनेचा मुख्य उद्देश दारिद्र्यरेषेखालील तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, महिन्याला १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज उपलब्ध करून देणे हा आहे. या प्रकल्पामुळे पात्र ग्राहकांना पुढील सुमारे २५ वर्षे मोफत वीज मिळणार असल्याचा दावा करण्यात आला आहे. ही योजना 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर राबविण्यात येत असल्याचेही महावितरणने स्पष्ट केले.



केंद्र सरकारकडून 'पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजने'अंतर्गत १ किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पासाठी ३० हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. याशिवाय राज्य सरकारकडून १७ हजार ५०० रुपयांपर्यंत अतिरिक्त अनुदान मिळणार आहे.

यामध्ये दारिद्र्यरेषेखालील ग्राहकांना केवळ २ हजार ५०० रुपये, अनुसूचित जाती-जमातीतील ग्राहकांना ५ हजार रुपये, तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील सर्वसाधारण ग्राहकांना १० हजार रुपये भरावे लागणार आहेत. उर्वरित रक्कम केंद्र आणि राज्य शासनाकडून अनुदान स्वरूपात दिली जाणार असल्याने ग्राहकांवर आर्थिक भार पडणार नसल्याचे महावितरणने म्हटले आहे.

या योजनेची माहिती केंद्र सरकारच्या 'पीएम सूर्यघर' मोबाईल प तसेच अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. महावितरणच्या "iSMART' पोर्टलवरूनही ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. अधिक माहितीसाठी किंवा अर्ज प्रक्रियेत मदत हवी असल्यास संबंधित महावितरण शाखा किंवा उपविभागीय कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

'स्मार्ट' योजनेच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू घटकांना सौर ऊर्जा क्रांतीमध्ये सहभागी करून घेण्याचा महावितरणचा प्रयत्न आहे. १ किलोवॅट क्षमतेचा हा प्रकल्प ग्राहकांना वीजबिलाच्या त्रासातून कायमस्वरूपी मुक्ती देऊ शकतो, असे महावितरणच्या पुणे विभागाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे यांनी सांगितले.

# SPOT NEWS

## शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित मागण्यांसाठी राज्यव्यापी आंदोलन

**● अकोले । वीरभूमी–**

महाराष्ट्र राज्य सार्वजनिक विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विविध प्रलंबित प्रश्नांसाठी राज्यव्यापी आंदोलन सुरू केले असून हे आंदोलन सहा टप्प्यांत करण्यात येणार असल्याची माहिती संघटनेचे पुणे विभागीय सचिव किशोर धुमाळ आणि विभागीय सदस्य शिवदत्त बंगाळ यांनी दिली. राज्यातील सर्व महाविद्यालयांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे. सातव्या वेतन आयोगानुसार १०, २० आणि ३० वर्षांच्या सेवेनंतर मिळणारी आश्वासित प्रगती योजना तात्काळ लागू करावी, राज्य सार्वजनिक विद्यापीठांतील उर्वरित शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करावा, सन २००५ पूर्वी जाहिरात प्रक्रिया पूर्ण होऊन २००५ नंतर नियुक्ती मिळालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, सेवानिवृत्त शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना रजा रोखीकरणाचा लाभ सातव्या वेतन आयोगानुसार अंतिम वेतनाच्या आधारे द्यावा, महाविद्यालयांतील रिक्त शिक्षकेत्तर पदे भरण्यास तात्काळ मंजुरी द्यावी, प्रयोगशाळा सहाय्यक व परिचरांना रजा रोखीकरणाचे लाभ पूर्ववत सुरू करावेत तसेच न्यायप्रविष्ट नसलेल्या महाविद्यालयीन प्रयोगशाळा सहाय्यकांची शासन निर्णय दि. २२ सप्टेंबर २०२५ नुसार सहाव्या व सातव्या वेतन आयोगाप्रमाणे ग्रेड पे २४०० नुसार वेतननिश्चिती करावी, अशा विविध मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून कामकाज केले. दुसऱ्या टप्प्यात दि. १८ ते २० मे २०२६ या कालावधीत दुपारच्या सुट्टीत धरणे, निषेध सभा आणि घोषणाबाजी करण्यात येणार आहे. त्यानंतर दि. २५ मे २०२६ रोजी राज्यव्यापी एकदिवसीय लेखणी बंद आंदोलन, दि. २९ मे २०२६ रोजी विभागीय सहसंचालक कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन, तसेच दि. १ जून २०२६ रोजी एक दिवसाचे लाक्षणिक कामबंद आंदोलन करण्यात येणार आहे. दरम्यान, शासनाने मागण्यांची दखल न घेतल्यास दि. ८ जून २०२६ पासून बेमुदत कामबंद आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

## आदित्य क्षीरसागर यांची थर्ड डॅन ब्लॅक बेल्ट परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

बारामती येथे दिनांक १६ व १७ मे २०२६ रोजी पार पडलेल्या डॅन ग्रेडेशन परीक्षेमध्ये अहिल्यानगर येथील युवा कराटे प्रशिक्षक सेन्सेई आदित्य क्षीरसागर यांनी उल्लेखनीय यश संपादन करत थर्ड डॅन बेल्ट परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे. त्यांच्या या यशामुळे क्रीडा व कराटे क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आदित्य क्षीरसागर हे अचिव्हर्स स्पोर्ट्स अकॅडमीचे संस्थापक व प्रशिक्षक असून त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना कराटेचे प्रशिक्षण देत राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडविण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. मेहनत, सातत्य आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी कराटे क्षेत्रातील मानाचा समजला जाणारा थर्ड डॅन ब्लॅक बेल्ट हा टप्पा गाठला आहे. ही परीक्षा ट्रॅडिशनल शोतोकान अँड स्पोर्ट्स कराटे ऑर्गनायझेशन (टी.एस.एस.के.ओ इंडिया) चे अध्यक्ष शिहान रवींद्र करळे तसेच टेक्निकल डायरेक्टर शिहान विनय बोढे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

# पाथर्डीला लवकरच मुबलक आणि शुद्ध पाणीपुरवठा

**नगराध्यक्ष अभय आव्हाड । जायकवाडी जलयोजना अंतिम टप्प्यात; सहा ते सात महिन्यांत पाणीप्रश्न सुटणार**

**● पाथर्डी । वीरभूमी –**

शहराला येत्या सहा ते सात महिन्यांत मुबलक आणि शुद्ध पाणीपुरवठा करण्यात येईल, अशी ग्वाही नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी दिली. शासनाच्या नगरोत्थान योजनेअंतर्गत जलजीवन मिशनमार्फत सुरू असलेल्या जायकवाडी धरणावरील नवीन नळपाणीपुरवठा योजनेची पाहणी नगराध्यक्ष अभय आव्हाड व नगरसेवकांनी केली. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, नगरसेवक नंदकुमार शेळके, बंडूशेठ बोरुडे, सुभाष बोरुडे, डॉ. जगदीश मुने, संजय देशमुख, देवा पवार, बाळासाहेब सोनटक्के, प्रतीक नांगरे, नगरसेविका डॉ. शारदा गर्जे, वंदना टेके, मनीषा उदमले, नगरपालिकेचे पाणीपुरवठा अधिकारी सचिन राजभोज, नळपाणी योजनेचे प्रोजेक्ट मॅनेजर राहुल काळे तसेच पाणीपुरवठा कर्मचारी हरिभाऊ पवार उपस्थित होते.



आव्हाड म्हणाले की, आमदार मोनिकाताई राजळे यांच्या विशेष प्रयत्नातून शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत पिण्याच्या पाण्याची पाइपलाइन योजना अंतिम टप्प्यात आली आहे. साकेगाव येथील जलशुद्धीकरण केंद्र, अमरापूर येथील सुरू असलेली कामे तसेच जायकवाडी येथील पाणी उपसा योजनेची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना ही योजना लवकरात लवकर कार्यान्वित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जायकवाडी योजनेच्या पाइपलाइनचे सुमारे ९५ टक्के काम पूर्ण झाले असून, शेवगाव शहरातील सुमारे एक किलोमीटरचा भाग तसेच पैठणजवळील बलदावा फार्महाऊस परिसरातील दीड किलोमीटरचे काम पिकांमुळे अपूर्ण राहिले असल्याचे त्यांनी सांगितले. या अडथळ्यांबाबत सकारात्मक चर्चा करून मार्ग काढण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले.

सध्या पाथर्डी शहराला जुन्या पाइपलाइनद्वारे पैठण धरणाच्या शेवटच्या टोकावरील दहिफळ येथून पाणीपुरवठा केला जात आहे. मात्र, कडक उन्हाळ्यामुळे तेथील पाण्याची पातळी कमी झाली आहे. तसेच शेवगाव-पाथर्डी आणि ग्रामीण भागातील ४८ गावांची संयुक्त पाणी योजना असल्याने पाथर्डीला पाणीपुरवठा करताना अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे शहरवासीयांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असल्याचे आव्हाड यांनी स्पष्ट केले.

नवीन पाइपलाइन योजना ही पैठण धरणाच्या भिंतीजवळून होत असल्यामुळे भविष्यात पाथर्डीचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सुटणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. येत्या सात ते आठ महिन्यांत पाथर्डीकरांना स्वच्छ आणि पूर्ण क्षमतेने दोन दिवसाआड पाणीपुरवठा केला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

पाथर्डीसाठी स्वतंत्र पाइपलाइन योजना मंजूर करून तिची कामे गतीने पूर्ण केल्याबद्दल आमदार मोनिकाताई राजळे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री पंकजाताई मुंडे तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे शहरवासीयांच्या वतीने त्यांनी आभार मानले.

### अमरापूर येथील व्यावसायिकांचे विशेष आभार

■ अमरापूर येथील मुख्य चौकात लहान व्यावसायिकांची दुकाने असल्यामुळे पाइपलाइनचे काम काही काळ बंद होते. याबाबत स्वतः चर्चा करून सहकार्याची विनंती करण्यात आली होती. स्थानिक व्यावसायिकांनी सकारात्मक प्रतिसाद देत आपली दुकाने बंद करून पाइपलाइनसाठी जागा उपलब्ध करून दिली. त्यांच्या सहकार्याबद्दल विशेष आभार व्यक्त करत असल्याचे नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी सांगितले.

## रामवाडी येथे संत तुकाराम महाराज गाथा पारायण व भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन



**● कोपरगाव । वीरभूमी–**

तालुक्यातील रामवाडी (संवत्सर) येथे दिनांक २१ पासून ते २८ पर्यंत जगद्गुरु संत तुकाराम महाराज गाथा पारायण सोहळा व भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच यावेळी वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ वारकऱ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे अशी माहिती आयोजकांनी दिली आहे.

अधिकमासाचे निमित्त साधून श्रीक्षेत्र रामवाडी येथे सकाळी ८ ते ११ गाथा पारायण सायंकाळी हरिपाठ आणि ७ ते ९ या वेळेत कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. या काळात हभप. हरीशरण गिरीजी महाराज, गणेश शास्त्री महाराज, हभप. बाळासाहेब महाराज रंजाळे, हभप. विश्वनाथ गिरीजी महाराज, हभप. शिवाजी महाराज ठाकरे, हभप. अर्जुन गिरीजी महाराज, हभप. शिवाजी महाराज भालूरकर यांची कीर्तन सेवा पार पडणार आहे.

दिनांक २८ रोजी सायंकाळी सद्गुरु गंगागिरी महाराज संस्थानचे मठाधिपती हिंदू धर्म रक्षक महंत रामगिरीजी महाराज यांचे काल्याचे किर्तन होणार असून भाविकांनी ज्ञानामृत व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त गाथा पारायण समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## वसुंधरा अकॅडेमीचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**इयत्ता पाचवीचे २२ तर आठवीचे १४ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र**

**● अकोले । वीरभूमी–**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतरिम निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत अभिनव शिक्षण संस्था संचलित वसुंधरा अकॅडेमीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले असून इयत्ता पाचवीचे २२ तर इयत्ता आठवीचे १४ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत विहान दत्तात्रय आहेर, ऋत्विक संजय वरसाळे, रुद्र यादव डगळे, साईश आशुतोष देशमुख, कृपा कैलास कांदळकर, हर्षद किशोर वाकचौरे, आयुष चंद्रकांत अहिरे, आराध्या अनिल जाधव, पिया रवींद्र शेवाळे, श्रुती सुंदर येवले, ऋतुजा राजेश शिंदे, वेदत्री दीपक साबळे, इरम आसिफ शेख, वेदांत युवराज आरोटे, ऋतिका संतोष साबळे, अलंकृता गणेश काळे, विपुल राजू सुकटे, स्नेहल विठ्ठल भुसारी, अवनी किरण काकड, ईशान्वी सागर चासकर, सिद्धी अविनाश देशमुख आणि पृथ्वी बाळासाहेब कोल्हाळ हे २२ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.

तर पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत प्रीतल सतीश चासकर, कस्तुरी दीपक राऊत, समर्थ विलास महाले, सोहम विजय दुर्गुडे, प्रणव प्रशांत बगनर, लावण्या अतुल लोहोटे, नालंदा किरण जाधव, विवेक जगन्नाथ जाधव, ओम विजय साठे, सोहम ऋषिकेश कानवडे, दिशा दशरथ दिवटे, शुभम मनोज पाटील, साईशा वसंत पवार आणि सर्वेश हौशीराम वर्पे हे १४ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.

या सर्व विद्यार्थ्यांना त्यांचे वर्गशिक्षक प्राजक्ता नेटके, पुनम शेटे, अण्णासाहेब केदार, नयन वाकचौरे तसेच कल्पना मंडलिक, पुष्पा हासे, अरुणा बगनर आणि उज्वला मुसळे यांचे मार्गदर्शन लाभले.

वसुंधरा अकॅडेमीच्या यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव नवले, कोषाध्यक्ष तथा वसुंधरा अकॅडेमीच्या प्राचार्य डॉ. जयश्री देशमुख, सचिव विक्रम नवले, सहसचिव अल्फोन्सा डी., सर्व संचालक मंडळ, उपप्राचार्य राधिका नवले तसेच वसुंधरा अकॅडेमीचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# संगमनेरकरांचे हक्काचे पाणी, रोटेशन काळात ११ तास वीज व पिकविम्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

संगमनेर तालुक्याला भंडारदरा व निळवंडे धरणाचे हक्काचे पाणी मिळावे, रोटेशन काळात शेतीसाठी पूर्ण दाबाने ११ तास वीजपुरवठा करावा तसेच शेतकऱ्यांना तातडीने पिकविमा मंजूर करावा, या प्रमुख मागण्यांसाठी संगमनेर तालुक्यातील कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांना निवेदन दिले.

महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते तथा माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुक्याने प्रतिकूल परिस्थितीतही विकासाची वाटचाल केली आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून तालुक्याच्या पाणी व वीज प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या आंदोलनात्मक निवेदनावेळी कारखान्याचे व्हा. चेअरमन पांडुरंग पाटील घुले, राज्य साखर संघाचे उपाध्यक्ष बाबासाहेब ओहोळ, शेतकी संघाचे चेअरमन संपतराव डोंगरे, फेडरेशनचे चेअरमन राजेंद्र गुंजाळ, ड. नानासाहेब शिंदे, मीननाथ वर्पे, विनोद हासे, सतीश वर्पे, गुलाबराव देशमुख, विलास शिंदे, अण्णासाहेब राहिंज, बाळासाहेब राहणे, नामदेव शिंदे, दादासाहेब देशमुख, भाऊसाहेब शिंदे, मुकेश काकड, दत्तात्रय वाघ, कैलास इंगळे, रावसाहेब काकड, जगन दिघे, शांताराम दिघे, कचरू लांडगे, नवनाथ देशमाने, भास्करराव पानसरे, शेखर वाघ, बाळासाहेब फापाळे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. त्यानंतर वीज वितरण विभागाच्या मुख्य अधीक्षक अभियंत्यांनाही निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, संगमनेर तालुका हा पर्जन्यछायेतील, डोंगराळ व अतिदुष्काळी भाग असून येथे दरवर्षी सरासरी दहा इंचांपेक्षाही कमी पाऊस पडतो. मोठ्या संघर्षानंतर १९८९ मध्ये संगमनेर तालुक्याला हक्काचे ३० टक्के पाणी मंजूर झाले होते. तसेच उपसा सिंचन योजनांसाठी आवर्तन काळात दररोज किमान १६ तास वीजपुरवठा आवश्यक असल्याचे आदेश असतानाही प्रत्यक्षात पुरेशा वीजेचा पुरवठा होत नसल्याची तक्रार करण्यात आली.

वीज नियामक आयोगाच्या निर्णयानंतर २०१० मध्ये रोटेशन काळात ११ तास पूर्ण दाबाने वीज देण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र गेल्या दोन वर्षांपासून हा पुरवठा बंद झाल्याने शेतकऱ्यांना हक्काचे पाणी उचलता येत नसल्याचा आरोप करण्यात आला. परिणामी संगमनेरचा हिस्सा खालच्या भागात वापरला जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निळवंडे कालव्यांचे काम पूर्ण होऊनही संगमनेरच्या शेतकऱ्यांना पाणी मिळण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे तालुक्यात तीव्र नाराजी पसरली असून वाढती उष्णता, पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि पशुधनाचे हाल यामुळे परिस्थिती गंभीर बनत असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले.



यावेळी बोलताना राज्य साखर संघाचे उपाध्यक्ष बाबासाहेब ओहोळ म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी दुष्काळग्रस्त भागासाठी निळवंडे धरण आणि कालव्यांचे काम पूर्ण केले. मात्र संगमनेर तालुक्याला जाणीवपूर्वक पाण्यापासून वंचित ठेवले जात आहे. रोटेशन काळात ११ तास वीज मिळत नसल्याने पाणी खालच्या भागाला जात आहे. तसेच तालुक्यातील शेतकऱ्यांनी सर्वाधिक पिकविमा भरूनही सॅटेलाइट अहवालाचे कारण देत शून्य टक्के पिकविमा देण्यात आला, हा शेतकऱ्यांवरील मोठा अन्याय आहे.

पांडुरंग पाटील घुले म्हणाले की, राजकीय हेतूने संगमनेर तालुक्यातील शेतकरी व नागरिकांना वेठीस धरण्याचा प्रकार सुरू असून तो कदापि सहन केला जाणार नाही. परिस्थिती बिघडून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास प्रशासन जबाबदार राहील.

जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी कार्यकर्त्यांचे म्हणणे ऐकून घेत संबंधित विभागांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. तसेच वीज वितरण विभागाच्या अधिकाऱ्यांनीही शेतकऱ्यांच्या समस्यांवर लवकर मार्ग काढण्याचे आश्वासन दिले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## पारनेरच्या न्यू आर्ट्स महाविद्यालयाला राष्ट्रीय पातळीवरील 'प्लॅटिनम सस्टेनेबल कॅम्पस' पुरस्कार!

**पारनेर । वीरभूमी–**

पर्यावरण संवर्धन आणि हरित कॅम्पस निर्मितीच्या ध्यासातून शाश्वत विकासाचे मॉडेल उभे करणाऱ्या पारनेर येथील 'न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालया'ने राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय यश प्राप्त केले आहे. भारत सरकारच्या पर्यावरण मंत्रालय आणि 'रिसर्च हाईट फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या 'भारत सस्टेनेबिलिटी कॅम्पस मिशन २०२६' अंतर्गत महाविद्यालयाला अत्यंत प्रतिष्ठेचा 'प्लॅटिनम सस्टेनेबल कॅम्पस' पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे. देशभरातून तब्बल बारा हजार महाविद्यालयांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला होता. अशा अत्यंत कठीण आणि स्पर्धात्मक वातावरणात न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजने आपली छाप पाडत राज्याच्या आणि अहिल्यानगर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर, उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे आणि अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय घुंगार्डे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली कॅम्पसमध्ये पर्यावरण संवर्धनाचे अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने हरित कॅम्पस विकास, जलसंधारण, व्यापक स्वरूपातील वृक्षारोपण, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि कचऱ्यापासून गांडूळ खत निर्मिती यांसारख्या शाश्वत उपक्रमांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, संपूर्ण परिसर 'प्लास्टिकमुक्त' करून स्वच्छतेचा एक उत्तम आदर्श महाविद्यालयाने प्रस्थापित केला आहे. याच सातत्यपूर्ण आणि प्रभावी अंमलबजावणीची राष्ट्रीय स्तरावर दखल घेत हा बहुमान जाहीर करण्यात आला आहे. येत्या १ जून २०२६ रोजी हैदराबाद येथे एका भव्य आणि दिमाखदार सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. या सोहळ्यासाठी देशभरातील पर्यावरण क्षेत्रातील नामवंत तज्ज्ञ, धोरणकर्ते आणि विविध शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

## नीट पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करा; बहुजन समाज पार्टीची मागणी

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

नीट परीक्षेमधील महाघोटाळा, पेपरफुटी आणि भ्रष्टाचाराची निष्पक्ष चौकशी करून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याची मागणी बहुजन समाज पार्टीच्या वतीने करण्यात आली. या प्रकरणातील मुख्य सूत्रधारांवर कठोर कारवाई करून भविष्यात अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणीही करण्यात आली. या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांना देण्यात आले असून, त्यांच्या मार्फत राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आले आहे. नीट परीक्षेमधील कथित महाघोटाळा, पेपरफुटी आणि भ्रष्टाचाराच्या निषेधार्थ बहुजन समाज पार्टीच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी जिल्हाध्यक्ष सुनिल ओहळ, जिल्हा उपाध्यक्ष शहानवाज शेख, जिल्हा महासचिव राजू शिंदे, निलेश घोडके, फिरोज शेख, बाळकृष्ण काकडे, राम ससाणे, शिवम साळवे, राहुल हरिभगत, उस्मान शेख, राहुल पटेकर, सुरेश गायकवाड, संतोष मोरे, नवनाथ साळवे, छबु मोरे, मच्छिंद्र बर्डे, दत्ता साळवे, अनिल लष्करे, गणेश बागल, श्याम आवटी आदी उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, देशातील लाखो होतकरू आणि मेहनती विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणारा हा 'नीट पेपरफुटी घोटाळा' अत्यंत गंभीर स्वरूपाचा आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सी मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार झाल्याचे समोर आले असून, या घटनेमुळे देशातील शिक्षण आणि परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला आहे. बहुजन समाज पार्टीने विद्यार्थ्यांच्या भविष्याचा आणि मेहनतीचा प्रश्न उपस्थित करत म्हटले आहे की, देशातील गरीब, दलित, मागासवर्गीय आणि मध्यमवर्गीय कुटुंबांतील विद्यार्थी कर्ज काढून, रात्रंदिवस अभ्यास करून डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहतात.

# संतप्त नागरिकांचा वीज वितरण कंपनीवर टेंभा मोर्चा

### अखंडित वीजपुरवठा, मनमानी बिलांवर संताप । स्मार्ट मीटर सक्तीविरोधात जोरदार घोषणाबाजी

**अकोले । वीरभूमी –**

अकोले शहर व तालुक्यातील वीज वितरण कंपनीच्या भोंगळ व ग्राहकविरोधी कारभाराविरोधात आज अकोले येथे संतप्त नागरिक, शेतकरी तसेच विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी आक्रमक टेंभा मोर्चा काढत वीज वितरण कंपनीच्या कार्यालयावर जोरदार धडक दिली. हातात टेंभे घेऊन आंदोलकांनी अखंडित वीज मिळालीच पाहिजे, मनमानी बिलं रद्द करा, शेतकऱ्यांना नियमित वीज मिळालीच पाहिजे, बळजबरीने स्मार्ट मीटर बसवून ग्राहकांची पिळवणूक करू नका अशा जोरदार घोषणांनी परिसर दणाणून सोडला.



तापलेल्या उन्हात असह्य उकाड्याच्या दिवसांत विशेषतः रात्रीच्या वेळी वारंवार खंडित होणारी वीज, शेतीपंपांना सुरळीत वीजपुरवठा न मिळणे, प्रत्यक्ष मीटर रीडिंग न घेता वाढीव वीज बिले आकारणे, तक्रारींकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष तसेच ग्राहकांना दिली जाणारी असभ्य वागणूक या प्रश्नांवर नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला. आंदोलकांनी अकोले उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता नामदेव शेळके यांना धारेवर धरत खडे बोल सुनावले.

ग्राहक नियमित वीज बिले भरतात, मग सतत गैरसोय, अंधार आणि अन्याय का सहन करायचा? असा संतप्त सवाल आंदोलकांनी उपस्थित केला. वीज ही चैनीची वस्तू नसून प्रत्येक नागरिकाची मूलभूत गरज बनली असताना सेवा देण्याऐवजी वीज वितरण कंपनी ग्राहकांची आर्थिक पिळवणूक करत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

उकाड्याच्या दिवसांत रात्रीच्या वेळी वारंवार वीज खंडित होत असल्याने लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, नुकत्याच बाळंत झालेल्या महिला तसेच रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे आंदोलकांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या शेतीपंपांना वेळेवर वीज मिळत नसल्याने पिके वाळत असून शेतकरी मोठ्या संकटात सापडले असल्याची घणाघाती टीकाही करण्यात आली.

कोणताही स्पष्ट तांत्रिक दोष नसताना ग्राहकांचे मीटर बदलून स्मार्ट मीटर बसवण्याची सक्ती का केली जाते? यामागील नेमका हेतू काय? असा सवाल आंदोलकांनी उपस्थित केला. मीटर रीडिंग न घेता मनमानी पद्धतीने वाढीव वीज बिले देऊन ग्राहकांची आर्थिक लूट सुरू असल्याचा आरोप करत नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

ग्राहक तक्रार घेऊन कार्यालयात गेल्यानंतर योग्य उत्तरे मिळत नाहीत, उलट उडवाउडवीची उत्तरे देत अपमानास्पद वागणूक दिली जाते, अशी तक्रारही यावेळी करण्यात आली. एप्रिल महिन्यात अकोले शहर व परिसरातील अनेक नागरिकांना वीज बिलेच मिळाली नसताना अचानक वाढीव रकमेची बिले कशी आकारली जातात, असा सवाल आंदोलकांनी उपस्थित केला.

मोर्चादरम्यान सुरेश गडाख, भाऊसाहेब चासकर, सुशांत गजे, अक्षय आभाळे, संदीप शेणकर, ड. के. बी. हांडे, मुकुंद भोर आदींनी संतप्त भावना व्यक्त करत वीज वितरण कंपनीच्या कारभारावर जोरदार टीका केली. विखे पाटील सोशल फाऊंडेशनचे कार्यकर्ते निखिल जगताप यांनी प्रास्ताविकात आक्रमक भाषण करत अधिकारी-कर्मचाऱ्यांचा तिखट शब्दांत समाचार घेतला.

यावेळी झालेल्या चर्चेत दत्ता नवले, सचिन शेटे, अनिल मोहिते, भाऊसाहेब निळे यांच्यासह अनेक ग्राहकांनी आपले अनुभव मांडत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. महिपाल देशमुख, विक्रांत देशमुख, संदीप भानुदास शेणकर, विष्णू कर्णिक, नवनाथ शेटे, परसराम शेळके, अमित नाईकवाडी, हरिभाऊ फापाळे, अनिल नवले, संतोष शिंदे आदी उपस्थित होते.

प्रशासनाला निर्वाणीचा इशारा देत आंदोलकांनी तात्काळ समस्यांचे निराकरण करा, अन्यथा येत्या काळात अधिक तीव्र आणि व्यापक आंदोलन छेडले जाईल, असा इशारा दिला. उपकार्यकारी अभियंता नामदेव शेळके यांनी आंदोलकांचे निवेदन स्वीकारले.

## ढाकणे इंजिनिअरिंग कॉलेजच्या प्राध्यापकांना भारत सरकारचे डिझाईन पेटंट



**पाथर्डी । वीरभूमी–**

समाजभूषण एकनाथराव ढाकणे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शेवगाव येथील प्राध्यापकांनी विकसित केलेल्या स्मार्ट क्रॉप वॉटर नालायझर या अभिनव प्रकल्पाला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून डिझाईन नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. कृषी क्षेत्रातील पाणी व्यवस्थापन अधिक प्रभावी, अचूक आणि तंत्रज्ञानाधारित करण्याच्या उद्देशाने विकसित करण्यात आलेल्या या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना मोठा लाभ होणार आहे.

भारत सरकारच्या The Patent Office, Government of India यांच्या वतीने या प्रकल्पाची नोंदणी डिझाईन क्रमांक ४६६८५१-००१ अंतर्गत करण्यात आली. या प्रकल्पाचे संशोधक व निर्माते म्हणून संगणक विभागप्रमुख प्रा. महेश मरकड, प्रा. श्रीकांत ढाकणे, प्रा. संदीप बोराळे, प्रा. ओंकार देशमुख, प्रा. श्रद्धा देशमुख आणि डॉ. संगीता पवार यांची नावे नोंदविण्यात आली आहेत. स्मार्ट क्रॉप वॉटर नालायझर ही कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सेन्सर तंत्रज्ञानावर आधारित स्मार्ट प्रणाली असून, ती जमिनीतील आर्द्रता, pH मूल्य, हवामान, तापमान, पर्जन्यमान तसेच पिकांच्या गरजा यांचे रिअल-टाइम विश्लेषण करून शेतकऱ्यांना अचूक सिंचनाच्या सूचना देते. या प्रणालीमुळे पाण्याचा अपव्यय कमी होऊन शाश्वत शेतीला चालना मिळणार आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. एकनाथराव ढाकणे, सचिव जया रहाणे, विश्वस्त ऋषिकेश ढाकणे तसेच प्रा. अंबादास डोंगरे आणि प्रा. रियाझखान अत्तार यांनी संशोधकांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## संजीवनी पॉलिटेक्निकमध्ये प्रवेश सुविधा केंद्र सुरू

### ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया; विद्यार्थ्यांना २२ जूनपर्यंत नोंदणीची संधी

**कोपरगाव । वीरभूमी–**

संजीवनी के.बी.पी. पॉलिटेक्निकमध्ये महाराष्ट्र शासनाच्या तंत्र शिक्षण संचालनालय (DTE), मुंबई यांच्या मान्यतेने २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी प्रथम वर्ष पॉलिटेक्निक प्रवेशाकरिता ऑनलाईन प्रवेश सुविधा केंद्र (फॅसिलिटेशन सेंटर) सुरू करण्यात आले आहे.

सुविधा केंद्राचे उद्घाटन २० मे पासून सुरू झाले असून विद्यार्थ्यांनी २२ जूनपर्यंत ऑनलाईन नोंदणी करून आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून घ्यावी, अशी माहिती प्राचार्य ए. आर. मिरीकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

प्रा. मिरीकर यांनी सांगितले की, अद्ययावत संगणकीय प्रयोगशाळा, पुरेशी इंटरनेट सुविधा, तसेच प्रशिक्षित व संवादक्षम प्राध्यापकवर्ग यांच्या आधारावर हे सुविधा केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेबाबत संपूर्ण मार्गदर्शन मिळणार आहे.



भारतीय नागरिकत्व असलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या गुणांच्या आधारे प्रवेश दिला जाणार आहे. सध्या दहावीचा निकाल जाहीर झाला असला तरी गुणपत्रिका उपलब्ध नसल्यास विद्यार्थ्यांनी आसन क्रमांक किंवा ऑनलाईन मार्कशीटची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

एसएससी निकालानुसार विद्यार्थ्यांचे गुण ऑनलाईन अर्जात सॉफ्टवेअरद्वारे आपोआप नोंदवले जाणार आहेत. हा नियम सीबीएसई व आयसीएसई बोर्डाच्या विद्यार्थ्यांनाही लागू असेल. पॉलिटेक्निक प्रवेशासाठी कोणतीही प्रवेश परीक्षा घेतली जाणार नसल्याने विद्यार्थ्यांवरील मानसिक ताण कमी होणार आहे.

या सुविधा केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संजीवनी संस्थेसह महाराष्ट्रातील कोणत्याही पॉलिटेक्निकमध्ये प्रवेशासाठी अर्ज करता येणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे क्षेत्र, पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम तसेच भविष्यातील करिअर संधींबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती, शैक्षणिक कर्ज आणि आवश्यक कागदपत्रांबाबत सविस्तर माहिती येथे उपलब्ध होणार आहे. तज्ज्ञ प्राध्यापकांची नेमणूक या केंद्रात करण्यात आली असून सर्व प्रकारचे मार्गदर्शन मोफत उपलब्ध आहे.

ऑनलाईन अर्जासाठी सर्वसाधारण प्रवर्गासाठी ४०० रुपये तर राखीव प्रवर्गासाठी ३०० रुपये शुल्क निश्चित करण्यात आले असून हे शुल्क ऑनलाईन पद्धतीने (डेबिट/क्रेडिट कार्ड, णझख किंवा नेटबँकिंग) भरावे लागणार आहे. अधिक माहितीसाठी प्रा. राहुल भाकरे (९५११७५७७१५) यांच्याशी संपर्क साधावा, असे प्राचार्य मिरीकर यांनी सांगितले.

# ऑनलाईन औषधविक्री कंपन्यांवर पायबंद घालावा

### केमिस्ट असोसिएशनची मागणी । शासनाने निर्णय न घेतल्यास आरोग्यमंत्र्यांना घेराव घालण्याचा इशारा

**पाथर्डी । वीरभूमी–**

नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या ऑनलाईन औषधविक्रीवर शासनाने तत्काळ बंदी घालून अनैतिक पद्धतीने औषधविक्री करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पाथर्डी तालुका केमिस्ट असोसिएशनच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भातील निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावे तहसीलदार उद्धव नाईक व पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांना देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अनेक ऑनलाईन कंपन्या मोबाईलच्या एका क्लिकवर नार्कोटिक्स अर्थात नशा येण्यासाठी वापरली जाणारी औषधे, गर्भनिरोधक औषधे, झोपेच्या गोळ्या तसेच डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय विक्री होणारी औषधे थेट घरपोच देत आहेत. त्यामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा गंभीर आरोप संघटनेच्या वतीने करण्यात आला.

यावेळी तालुका केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष सुहास जरांगे म्हणाले की, ज्या औषधांच्या विक्रीसाठी स्थानिक मेडिकल दुकानांवर कडक नियम लागू आहेत, तीच औषधे ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर कोणतीही शहानिशा न करता कमी किमतीत सहज उपलब्ध होत आहेत. डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन तपासल्याशिवाय औषधविक्री होत असल्याने युवकांमध्ये व्यसनाधीनता वाढत असल्याचा आरोप त्यांनी केला.

विशेषतः झोपेच्या गोळ्या, गर्भलिंग तपासणीनंतर गर्भपातासाठी वापरली जाणारी औषधे तसेच नियंत्रित औषधांचा गैरवापर वाढत असून, त्यामुळे स्त्रीभ्रूणहत्या आणि तरुण पिढीच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

संघटनेचे उपाध्यक्ष संतोष जिरेसाळ यांनी नियम फक्त स्थानिक मेडिकल दुकानदारांसाठी आणि ऑनलाईन कंपन्यांना मोकळे रान का? असा सवाल उपस्थित केला.



तसेच शासनाच्या धोरणाच्या निषेधार्थ बुधवारी औषध दुकाने बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती दिली. शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आरोग्यमंत्र्यांना घेराव घालत तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

या आंदोलनात प्रकाश पालवे, अशोक गांधी, पंकज मुनोत, गणेश बाहेती, संदीप लोखंडे, जालिंदर सदावर्ते, पांडू मंत्री, मुन्ना शेठ जाजू, अरुण आंधळे, सय्यद फैयाज, राहुल कांबळे, अविनाश पालवे, धनंजय फुंदे, सोमनाथ फासे आदी पदाधिकारी आणि केमिस्ट बांधव उपस्थित होते.

# गोदावरी वसाहत व ३४० गट नंबरमधील जागा रहिवाश्यांच्या नावावर करणार

## डॉ. सुजय विखे पाटील । विधानसभा निवडणुकीत दिलेला शब्द पाळला; सातबाऱ्यावर ‘महाराष्ट्र शासन’ नाव नोंद झाल्याने कायदेशीर प्रक्रिया सुलभ

**राहाता । वीरभूमी–** राहाता तालुक्यातील साकुरी येथील गोदावरी वसाहतीतील रहिवाश्यांच्या जागा त्यांच्या नावावर करण्याचा मार्ग मोकळा झाला असून, विधानसभा निवडणुकीत दिलेला शब्द आपण पाळला असल्याचे प्रतिपादन भाजपा प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.

साकुरी येथील गोदावरी वसाहतीतील रहिवाश्यांच्या जागेच्या प्रश्नासंदर्भात विशेष पाठपुरावा करून त्या जागा रहिवाश्यांच्या नावावर करण्याबाबत डॉ. विखे पाटील यांनी राहाता बाजार समितीत स्थानिक रहिवासी व कार्यकर्त्यांची बैठक घेतली. यावेळी बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, गणेश कारखान्याचे माजी चेअरमन मुकुंदराव सदाफळ, मोहन सदाफळ, संजू सदाफळ, डॉ. स्वाधीन गाडेकर, नगराध्यक्ष विजय सदाफळ, उपनगराध्यक्ष कैलास सदाफळ, नगरसेवक मुन्ना शहा, राजेंद्र निकाळे, सुधाकर दंडवते, कानीफ बावके, संदीप दंडवते, भारत बनसोडे, सचिन बनसोडे, शिवाजी नजन, सतिश बावके, विकास बावके, हरिश श्रीखंडे, रमेश गायकवाड, पप्पू बनसोडे, बबन बनसोडे, अक्षय रोहोम, बाबासाहेब डांगे, रावसाहेब बनसोडे, पुंडलिक बावके, नंदा माळी, चंद्रकांत बनसोडे, बाळू जाधव, सुनील लोखंडे, दीपक शिंदे, दीपक दंडवते, शहा, किशोर दंडवते आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. विखे पाटील म्हणाले की, राहाता येथील ३४० गट नंबर आणि साकुरीतील गोदावरी वसाहतीच्या जागेबाबत अनेक तांत्रिक अडचणी होत्या. ही जागा वनविभागाच्या अखत्यारित असल्याने अनेक अडथळे निर्माण होतील, अशी शंका काहींनी व्यक्त केली होती. मात्र, सुजय विखे पाटील दिलेला शब्द पूर्ण करतात, हा सर्वसामान्यांचा विश्वास होता आणि तो आपण प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा करून सार्थ ठरविला.

ते पुढे म्हणाले की, या जागेच्या संदर्भात सर्वात मोठी अडचण म्हणजे सातबाऱ्यावर ‘सरकार’ असे नाव नोंद झाले होते. त्यामुळे मोठी गुंतागुंत निर्माण झाली होती. मात्र, दोन दिवसांपूर्वी सातबाऱ्यावर ‘महाराष्ट्र शासन’ अशी नोंद करण्यात आली असून, त्यामुळे आता कायदेशीररित्या स्थानिक नागरिकांच्या नावावर जागा करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तुमची जागा तुमच्या नावावर फक्त आणि फक्त सुजय विखेच करू शकतो, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

अनेक वर्षांपासून सुरू असलेला ३४० गट नंबर व गोदावरी वसाहतीतील रहिवाश्यांचा संघर्ष आता संपल्याचे सांगत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनामुळे हा प्रश्न मार्गी लागल्याचे नमूद केले. विधानसभा निवडणुकीत दिलेला शब्द पूर्ण केल्याचा अभिमान असल्याचेही त्यांनी सांगितले.



राजकारणात आपण ऐश्वर्य आणि वैभव कमावले, पण सर्वात मोठी कमाई म्हणजे विश्वासार्हता, असे सांगत त्यांनी शिर्डीतील लक्ष्मीनगर भागातील प्रश्नही आपल्या शब्दावर सोडविल्याचे नमूद केले. पोलिस फाटा लागला नाही. त्यामुळे आता प्रत्येकाच्या नावावर सुमारे २५ लाख रुपये किमतीची जागा झाली आहे, असे ते म्हणाले.

पालिका निवडणुकीत नागरिकांनी दाखविलेल्या विश्वासामुळे निर्विवाद सत्ता मिळाल्याचे सांगत त्यांनी साकुरीमध्ये पाच कोटी रुपयांची विकासकामे करण्यात आल्याचे स्पष्ट केले. अंतर्गत गटारी, रस्ते आणि इतर मूलभूत सुविधांची कामे मार्गी लागल्याचे त्यांनी सांगितले. तुम्ही सर्वजण मतभेद विसरून एकत्र आलात, त्यामुळे हे शक्य झाले, असेही ते म्हणाले.

राहाता शहरासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिल्याचा उल्लेख करत त्यांनी मतदारसंघात धर्म आणि जातीयतेला थारा दिला जाणार नसल्याचे स्पष्ट केले. तसेच गुन्हेगारीविरोधात कठोर भूमिका घेण्याचा इशाराही त्यांनी दिला. मुलींची छेड काढणाऱ्यांच्या घरावर बुलडोझर चालविण्यास मागेपुढे पाहणार नाही, असा इशारा त्यांनी गुन्हेगारांना दिला.

# पुरुषोत्तम मासानिमित्त श्री मोहटादेवी मंदिरात आंब्यांच्या फळांची आकर्षक सजावट

## मनमोहक आरास पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी । भक्तिमय वातावरणाने परिसर दुमदुमला

**पाथर्डी । वीरभूमी–** पुरुषोत्तम मास अर्थात अधिक मासातील मंगळवाराचे औचित्य साधत पाथर्डी तालुक्यातील महाराष्ट्रभर प्रसिद्ध असलेल्या श्री मोहटादेवी मंदिरात आंब्यांच्या फळांनी आकर्षक आणि मनमोहक सजावट करण्यात आली. या अनोख्या सजावटीमुळे मंदिर परिसर भाविकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरला.



महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री मोहटादेवीच्या गाभाऱ्यात विविध प्रकारच्या आंब्यांच्या फळांची सुंदर आरास करण्यात आली होती. देवीच्या चरणी आंब्यांचा नैवेद्य अर्पण करून मंदिर परिसर फुलांनी आणि फळांनी सजविण्यात आला होता. देवीच्या मूर्तीसमोर रचलेली आंब्यांची आकर्षक मांडणी आणि पारंपरिक सजावटीमुळे गाभाऱ्याचे सौंदर्य अधिक खुलून दिसत होते.

पुरुषोत्तम मासाला हिंदू धर्मात विशेष धार्मिक महत्त्व असून या काळात देवी-देवतांची पूजा, अभिषेक, आरती, नामस्मरण तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांना विशेष महत्त्व दिले जाते. त्यानिमित्ताने श्री मोहटादेवी मंदिरात पहाटेपासूनच भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. अनेक भाविकांनी देवीचे दर्शन घेत मनोकामना व्यक्त केल्या.

मंदिर प्रशासनाच्या वतीने भाविकांसाठी दर्शनाची सुयोग्य व्यवस्था करण्यात आली होती. मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून आई राजा उदो उदोच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

अधिक मासाची पर्वणी साधत देवीचा आशीर्वाद मिळवण्यासाठी जिल्ह्यासह राज्यातील विविध भागांतून भाविक मोठ्या संख्येने दाखल झाले होते. या आगळ्यावेगळ्या फळ सजावटीमुळे श्री मोहटादेवी मंदिर पुन्हा एकदा भक्तांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले आहे.

# पारनेर तालुक्यातील वन उद्यानाच्या कामावरून मनसे आक्रमक

## निकृष्ट कामे खपवून घेतली जाणार नसल्याचा अधिकारी आणि कंत्राटदारांना इशारा

**पारनेर । वीरभूमी–** तालुक्यातील विविध विकासकामांसाठी तसेच प्रस्तावित वन उद्यानासाठी निधी मंजूर केल्याबद्दल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने अहमदनगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानण्यात आले आहेत. मात्र, पालकमंत्र्यांच्या चांगल्या हेतूला अधिकारी आणि कंत्राटदारांनी हरताळ फासू नये, असा इशारा मनसे पारनेर तालुक्याच्या वतीने देण्यात आला आहे.

या संदर्भात मनसेचे पारनेर तालुका अध्यक्ष अविनाश मुरलीधर पवार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. त्यांनी म्हटले आहे की, पालकमंत्री विखे पाटील यांनी कामाचा दर्जा उत्तम राखण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. मात्र, अधिकारी आणि कंत्राटदार यांना याचा विसर पडलेला दिसतो.

सुपा परिसरात सध्या तीव्र पाणीटंचाई असून नागरिकांना आठ-आठ दिवस पाणी मिळत नसल्याचे त्यांनी नमूद केले. अशा परिस्थितीत प्रस्तावित वन उद्यानाच्या ठिकाणी घोटभर पाणीही उपलब्ध नसताना या प्रकल्पासाठी पाणी कुठून आणले जाणार, याचे उत्तर संबंधित विभागाने आधी द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

यापूर्वी नगर-पुणे महामार्गावरील स्ट्रीट लाईट पोलचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप करत पवार म्हणाले, काही बालिश कंत्राटदारांनी कोट्यवधी रुपयांचा निधी वाया घालवला. केवळ टक्केवारीच्या मोहापोटी भविष्याचा विचार न करता ही कामे करण्यात आली. पालकमंत्र्यांची दिशाभूल करून असे प्रकार पुन्हा खपवून घेतले जाणार नाहीत.

पाण्याची कोणतीही ठोस व्यवस्था नसताना वन उद्यानाचे काम रेटून नेण्याचा प्रयत्न झाला, तर माळरानावर वन उद्यान फुलण्याऐवजी केवळ काही कार्यकर्ते, कंत्राटदार आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांना पोसण्याचे काम होईल, अशी भीतीही मनसेच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे. जनतेच्या पैशांची उधळपट्टी सहन केली जाणार नसल्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

प्रशासनाने तात्काळ या प्रकल्पासाठी पाण्याचा स्रोत आणि कामाच्या दर्जाबाबत स्पष्टीकरण द्यावे, अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेना आपल्या शैलीत तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा मनसे पारनेर तालुका अध्यक्ष अविनाश पवार यांनी दिला आहे.

# पाथर्डीतील प्रभाग क्रमांक ८ मध्ये गतिरोधक बसवा

## भरधाव वाहनांमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर । नगरसेवकांचे प्रशासनाला निवेदन

**पाथर्डी । वीरभूमी–** शहरातील प्रभाग क्रमांक ८ मधील इंदिरानगर, शिवशक्तीनगर, एडके कॉलनी आणि फुलेनगर परिसरात भरधाव वाहनांच्या वाढत्या वेगामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. विशेषतः अंतर्गत रस्ते, शाळा परिसरातील मार्ग तसेच वर्दळीच्या ठिकाणी वाहनचालकांकडून वेगमर्यादेचे उल्लंघन होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ८ ‘ब’चे नगरसेवक प्रतीक राजेंद्र नांगरे आणि मनिषा उदमले यांनी पाथर्डी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष अभय आव्हाड तसेच मुख्याधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. संबंधित भागांची तातडीने पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी गतिरोधक बसवावेत, अशी मागणी त्यांनी केली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, या परिसरात लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणात ये-जा करतात. अनेक रस्त्यांवर वाहनांचा वेग नियंत्रणाबाहेर जात असल्याने भविष्यात गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी नगरसेवक प्रतीक नांगरे म्हणाले, प्रभागातील नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत आहेत. विशेषतः शाळा परिसर आणि अंतर्गत रस्त्यांवर वाहनांचा वेग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. प्रशासनाने तातडीने लक्ष घालून गतिरोधक उभारल्यास अपघातांना आळा बसण्यास मदत होईल.

दरम्यान, प्रभागातील नागरिकांनीही या मागणीचे स्वागत केले असून प्रशासनाने त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत आवश्यक त्या ठिकाणी नियमानुसार गतिरोधक बसविण्यात येतील, असे आश्वासन नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी दिले.

या आश्वासनामुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाकडून लवकरच प्रत्यक्ष कार्यवाही होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# जिल्ह्यातील शेकडो शिक्षकांचे वेतन रखडले

## संचमान्यता तात्काळ ‘इंटिग्रेट’ करण्याची माध्यमिक शिक्षक संघाची मागणी

**अहिल्यानगर । वीरभूमी–** जिल्ह्यातील सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षातील संचमान्यता दुरुस्ती झालेल्या शंभराहून अधिक शाळांतील शेकडो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन अद्यापही रखडले असल्याने मोठी आर्थिक अडचण निर्माण झाली आहे. संबंधित संचमान्यता शालार्थ प्रणालीमध्ये ‘इंटिग्रेट’ न झाल्यामुळे मे २०२६ महिन्याचे वेतन फॉरवर्ड होत नसल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून, अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाने याबाबत शिक्षण विभागाकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.



या संदर्भात अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे, सचिव अमोल ठाणगे आणि उपाध्यक्ष सोमनाथ सुंबे यांनी माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना निवेदन दिले. यावेळी मुख्याध्यापक सुदाम दळवी, दीपक थोरात तसेच कोपरगाव तालुका संघटनेचे कैलास शेळके उपस्थित होते.

शिक्षक संघाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, काही शाळांची सन २०२४–२५ या वर्षातील संचमान्यता पदे शून्य झाली होती. त्यामुळे संबंधित शाळांमधील शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक कामकाजात अडथळे निर्माण झाले होते. मात्र सन २०२५–२६ च्या संचमान्यतेमध्ये संबंधित शाळांना पुन्हा पदे मंजूर करण्यात आली असून त्यानुसार संचमान्यता दुरुस्तीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

तथापि, संबंधित संचमान्यता अद्याप शालार्थ प्रणालीमध्ये ‘इंटिग्रेट’ करण्यात आलेली नाही. परिणामी संबंधित शाळांचे वेतन प्रस्ताव फॉरवर्ड होत नसून मे २०२६ चे वेतन रखडले आहे. अनेक शिक्षक व कर्मचाऱ्यांना घरखर्च, बँक कर्जाचे हप्ते, मुलांच्या शिक्षणाचा खर्च आणि दैनंदिन आर्थिक व्यवहार सांभाळताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षण विभागाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन संचमान्यता तातडीने ‘इंटिग्रेट’ करावी व संबंधित शिक्षक-कर्मचाऱ्यांचे वेतन त्वरित अदा करण्याची मागणी केली आहे. प्रशासकीय तांत्रिक कारणांमुळे शिक्षकांना वेतनापासून वंचित ठेवणे अन्यायकारक असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

शिक्षण विभागाने त्वरित कार्यवाही करून रखडलेल्या वेतनाचा प्रश्न मार्गी लावावा, अन्यथा शिक्षक संघटनेच्या वतीने पुढील तीव्र आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.